ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## राज्य व्यवस्थापन कक्ष – पंचायत राज

## पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

# 'नागरिकांची सनद'

**प्रस्तावना** – केंद्र शासनाने 12 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांचे एकत्रिकरण करून पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी "राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान" हा एकछत्री कार्यक्रम सन 2013-18 या कालावधीत राबविला. ग्राम विकास विभागाच्या शा.नि.क्र.रागांपं-2012/प्र.क्र.92/योजना-4 दि.03-03-2014 अन्वये सदर केंद्र पुरस्कृत अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सन 2018-19 या कालावधीसाठी या योजनेचे पुनर्गठन करून "राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान" ही केंद्र पुरस्कृत योजना ग्राम विकास विभागाच्या शा.नि.क्र.राग्रास्वअ-2018/प्र.क्र.121/योजना-4 दि.20-02-2019 अन्वये राबविण्यात आली. या योजनेचा कालावधी 2021-22 पर्यंत असल्यामुळे केंद्र शासनाने या योजनेमध्ये काही सुधारणा करून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अशी योजना जाहिर केली, त्यानुसार ग्राम विकास विभागाकडील शा.नि.क्र.राग्रास्वअ-2022/प्र.क्र.40/आस्था-15 दि.16/09/2022 अन्वये योजना राज्यात लागू करण्यात आली. या योजनेचा अंमलबजावणी कालावधी दि.01-04-2022 ते दि.31-03-2026 असा आहे.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाच्या शा.नि.क्र.राग्रास्वअ-2018/प्र.क्र.121/योजना-4 दि.20-02-2019 अन्वये राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत अभियानाच्या अंमलबजावणी, व्यवस्थापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष – पंचायत राज (SMU-PR) स्थापन करण्यात आले आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष – पंचायत राज (SMU-PR) या कार्यालयामार्फत खालील कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते.

1) पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान
2) ग्राम पंचायत सरपंच, उपसरपंच आणि कर्मचारी यांचे मानधन अदाई.
3) आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत केंद्रचालकांचे मानधन अदाई.
4) केंद्र व राज्य शासनाने विकसित केलेल्या विविध स्वरुपांच्या संगणक प्रणाली, पोर्टल्स यांचे सी.एस.सी. ई गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड (CSC) मार्फत सनियंत्रण करणे.
5) केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाकडील कामकाजासाठी राज्य नोडल ऑफीसर म्हणून कामकाज पाहणे.

# पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

## (अ) निधी- स्त्रोत संकल्पना -

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असून यामध्ये केंद्र हिस्सा 60% व राज्य हिस्सा 40% असा आहे. या अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी व त्या मर्यादेत राज्य हिस्सा उपलब्ध करून दिला जातो. सदर निधी योजनेतंर्गत उघडण्यात आलेल्या Single Nodal Account (SNA) मध्ये वर्ग केला जातो.

## (ब) प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व मनुष्यबळ -

अभियानाच्या अंमलबजावणीव व व्यवस्थापनासाठी राज्य स्तरावर राज्य व्यवस्थापन कक्ष, जिल्हास्तरावर जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व तालुकास्तरावर तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आले असून, यातील मनुष्यबळ तपशील खालीलप्रमाणे आहे.

### i) राज्यस्तर – राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मनुष्यबळ(SPMU) – मंजूर पदे – 17

1) विभागीय समन्वयक (2 पदे)
2) प्रशिक्षण समन्वयक
3) माहिती, शिक्षण व संवाद समन्वयक
4) ग्रा.पं./प.सं./जि.प. विकास आराखडा समन्वयक
5) शाश्वत विकासाची ध्येये स्थानिकीकरण समन्वयक
6) लेखा समन्वयक
7) आस्थापना समन्वयक
8) प्रशासन समन्वयक
9) परिचर (4 पदे)
10) राज्य प्रकल्प व्यवस्थापक
11) राज्य समन्वयक (सनियंत्रण व मुल्यमापन) तथा वित्तीय सल्लागार
12) सांख्यिकीय विश्लेषक
13) तांत्रिक समन्वयक

### ii) जिल्हास्तर -

अ) जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPMU) ( प्रत्येक जिल्हयासाठी 3 याप्रमाणे मंजुर पदे- 102)
   1. जिल्हा व्यवस्थापक (RGSA)
   2. लेखापाल तथा सनियंत्रण व मूल्यमापन समन्वयक
   3. लिपीक तथा डाटा एंट्री ऑपरेटर

आ) पेसा जिल्हयासाठी एक जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (PESA) पद याप्रमाणे 13 पेसा जिल्हयांसाठी 13 पदे मंजुर

### iii) तालुकास्तर -

अ) तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU) ( प्रत्येक तालुक्यासाठी 2 याप्रमाणे मंजुर पदे -702)
   1. तालुका व्यवस्थापक (RGSA)
   2. लेखा सहायक तथा डाटा इंजिनियर

आ) पेसा तालुक्यासाठी एक याप्रमाणे तालुका प्रशिक्षण समन्वयक (PESA) यांची एकूण 59 पदे मंजुर

## (क) कार्यक्रमाची उद्दीष्टे व कार्ये :-

1) शाश्वत विकासाची ध्येये (Sustainable Development Goals) साध्य करण्यासाठी पंचायत राज संस्थांमध्ये सुप्रशासन क्षमता विकसित करणे.
2) पंचायत राज संस्थांमधील, ग्रामपंचायत या तिस-या व तळातील स्तरावरील लोकप्रतीनिधीं मध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी क्षमता बांधणी करणे.
3) महत्वाच्या राष्ट्रीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध साधन सामुग्रीचा पुरेशा प्रमाणात वापर, विविध योजनांचे अभिसरण (Convergence) आणि सर्वसमावेशक स्थानिक सुप्रशासनासाठी पंचायतीची क्षमता वृध्दींगत करणे.
4) पंचायतराज संस्थांच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करणे.
5) पंचायतराज व्यवस्थेमध्ये पारदर्शीपणा व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी ग्रामसभांचे बळकटीकरण करणे.
6) भारतीय राज्य घटना व पेसा कायदा 1996 यामधील तरतुदी व उद्दिष्टे विचारात घेऊन पंचायतराज संस्थांना अधिकार व जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण करणे.
7) पंचायतराज संस्थांना प्रशिक्षण, सक्षमीकरण व मार्गदर्शन करण्यासाठी उत्कृष्ट संस्थांचे जाळे निर्माण करणे.
8) पंचायतराज संस्थांमधील विविध पातळीवर क्षमता वाढीसाठी संस्थांना बळकटी देणे आणि त्यांना मुलभूत सुविधा, मानव संसाधनांची उपलब्धता आणि त्यांचे परिणामकारक प्रशिक्षण यांची दर्जेदार मानके साध्य करण्यासाठी सक्षमीकरण करणे.
9) पंचायतराज संस्थांमध्ये जबाबदार व पारदर्शक सुप्रशासन, प्रशासकीय कार्यक्षमता व सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी ई- गव्हर्नन्स व इतर तंत्रज्ञान आधारित उपाययोजना करणे.
10) पंचायतराज संस्थांच्या शाश्वत विकासाची ध्येयपुर्ती (Sustainable Development Goals) व इतर कामगिरीची दखल घेवून प्रोत्साहनपर बक्षिस देणे.
11) प्रचार,प्रसार व प्रसिध्दीच्या माध्यमातुन विविध क्षेत्रातील सर्व भागीदार घटकांची क्षमतावृध्दी करणे.
12) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून माहिती, संकल्पना व उपक्रमांची देवाणघेवाण करणे.

## (ड) प्रशासकीय संरचना –

शासन निर्णय, ग्राम विकास विभागाकडील शा.नि.क्र.राग्रास्वअ-2022/प्र.क्र.40/आस्था-15 दि.16 सप्टेंबर, 2022 अन्वये पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान राबविणेबाबत सूचना असून, राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या अधिपत्याखालील व नियंत्रणाखाली कार्यरत आहे. अभियानातंर्गत विविध उपक्रमांचा नियमित आढावा घेऊन सनियंत्रण व मुल्यमापनासाठी खालील प्रमाणे विविध स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**i) दिशादर्शक समिती –**

अभियानाच्या प्रगती संदर्भात अपेक्षित फलनिष्पत्तीच्या दृष्टीने नियंत्रण ठेवण्याकरिता तसेच पंचायती राज व्यवस्थेकडे विविध विषय, कर्मचारी व निधीचे हस्तांतरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णयासाठी मा.मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखालील दिशादर्शक समिती परिशिष्ट - 1 प्रमाणे आहे.

**ii) सुकाणू समिती** -

निधीचे हस्तांतरण आणि राज्य शासनाच्या विविध विभागांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती परिशिष्ट - 2 प्रमाणे आहे.

iii) **राज्य कार्यकारी समिती** -

अभियानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या सर्व बाबींचे सनियंत्रण करण्याकरिता मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतीराज यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती परिशिष्ट-3 प्रमाणे आहे. राज्य कार्यकारी समिती अभियानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या सर्व बाबींचे सनियंत्रण करेल. अभियान अंमलबजावणी विषयाचे सर्व अधिकार या समितीस आहे.

**iv) जिल्हा सनियंत्रण समिती** -

जिल्ह्यातील अभियानाची अंमलबजावणी, सनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण समिती परिशिष्ट – 4 प्रमाणे आहे.

## (इ) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील कार्यरत विभाग

1. प्रशासन / आस्थापना विभाग –

   विधान मंडळ कामकाज हाताळणे, सर्वसाधारण अभिकरण सभा, नियंत्रण सभा, कार्यकारी सभा, अभियानाच्या राज्य प्रकल्प कक्षातील शासकीय कर्मचा-यांच्या सेवा विषयक बाबी, मंत्रालयस्तरावरील विविध प्रकरणांचा पाठपुरावा करणे, कार्यालयीन कामकाज पध्दती विषयक प्रशिक्षण घेणे, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाचे व्यवस्थापन, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची सर्व प्रकारची देयके अदा करणे, टपालाचे आवक-जावक,वाटप , साहित्य (Stationary) पुरवठा (दैनंदिन कामकाजासाठी व बैठका/कार्यशाळेसाठी) त्यांची खरेदी, नोंद, संग्रह व वाटप करणे, कार्यालयीन सोयी-सुविधा पुरविणे/स्वच्छता व सुशोभिकरण करणे / कामकाजासाठी सामान/वस्तूंची खरेदी, नोंद, पुरवठा, वाहन व्यवस्था, TA-DA प्रकरणे, कार्यालयीन उपस्थिती, शिस्त व वर्तणूक यावर पर्यवेक्षण करून त्याबाबतवरिष्ठांना कळविणे, सेवापुस्तक, रजेचा हिशेब, गोपनीय अहवाल, वैयक्तिक नस्त्या, महत्वाची कागदपत्रे इ. चा अभिलेख जतन करणे.

2. नियोजन/लेखा/सांख्यिकी विश्लेषण विभाग –

   पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानातंर्गत विविध 1) प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम, 2) मूलभूत सुविधा, 3) व्हर्चुअल क्लासरुम, 4) ग्राम पंचायत मूलभूत सुविधा 5) प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, 6) पेसा – विशेष सहाय्य 7) नाविन्यपूर्ण उपक्रम, 8) माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम इ उपक्रम राबविले जातात. या सर्व उपक्रमाचे नियोजन करणे, वार्षिक कृती आराखडा तयार करणे, अर्थसंकल्पीय तरतुदी करणे, नियंत्रण व कार्यकारी सभा आयोजन करणे. निधी मागणी प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास पाठविणे. जिल्हा व यशदा या अंमलबजावणी यंत्रणेस PFMS संकेतस्थळाद्वारे निधी आहरण मर्यादा निश्चित करून देणे. तसेच योजनेतंर्गत विविध देयके तपासून पारित करणे.

3. माहिती, शिक्षण व संवाद विभाग –

अभियानाच्या विविध उपक्रमांमध्ये जनतेचा व समाजातील विविध घटकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळावा याकरिता प्रसार माध्यमांचा कल्पकतेने वार करून जनजागृती व लोकप्रबोधनाचा व्यापक प्रयत्न करण्यात येतो. यासाठी जिल्हास्तरावर प्रभाग स्तरावर व तालुका स्तरावर एक दिवसीय शिबिरे, दूरदर्शन, रेडिओ, उपग्रह वाहिनी, व्हिडीओ, फिल्मस, नाटय व पथनाटय, चित्रकला स्पर्धा, व सचित्र मार्गदर्शिका, नियतकालिके, स्थानिक मेळावे, अभ्यास सहली, स्थायी व फिरती प्रदर्शने इत्यादी बहुविध माध्यमे व उपकरणे उपलब्ध करून परिस्थितीनुरुप वापर करण्यात येतो.

विविध विषय / उपक्रमाबाबत चित्रफित (short flims) तयार करून प्रसारित करणे. विविध कार्यक्रमांच्या घडी पत्रिका, पोस्टर्स, माहिती पुस्तिका तयार करणे.

4. प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम विभाग –

राज्यातील पंचायत राज संस्थांची संख्या, त्यामध्ये कार्यरत असलेले लोकप्रतिनिधी व अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या, स्थानिक स्वराज संस्थांकडे हस्तांतरित केलेले व करावयाचे विविध विषय, संस्थांचे व्यवस्थापन, आर्थिक बाबी, शाश्वत विकासाच्या ध्येयांचे स्थानिकीकरण, विविध योजनांचे अभिसरण (Convergence) आणि सर्वसमावेशक स्थानिक सुप्रशासनासाठी पंचायतीची क्षमता वृध्दींगत करणे, सामाजिक अभिसरण (Social Mobilisation) इ. बाबी विचारात घेवून प्रशिक्षण व क्षमताबांधणीचा वार्षिक आराखडा राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) व राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) यांच्या समन्वयाने तयार करणे. यात प्रामुख्याने खालील बाबीचा समावेश असतो.

1. पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी विकसित केलेल्या National Capability Building Frame work (NCBF) आधारित प्रशिक्षण व क्षमताबांधणीचे उपक्रम.

2. केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाने निश्चित केलेल्या शाश्वत विकासाच्या ध्येयांचे स्थानिकीकरणासाठी नऊ संकल्पनांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम राबविणे.

3. आकांक्षित जिल्हे व तालुके (Aspirational Districts and Blocks) व मिशन अंत्योदय ग्रामपंचायती मधील नव्याने निवडून आलेले लोकप्रतिनिधी व अधिकारी / कर्मचा-यांचे विशेष प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम राबविणे.

4. नेतृत्व विकास, स्थानिक नियोजन, कार्यालय व्यवस्थापन, स्वउत्पन्नाचे स्त्रोत निर्मिती, विविध योजनांची अंमलबजावणी व देखरेख, महिला सक्षमीकरण व राष्ट्रीय महत्त्वाचे विषय इ. बाबींचा समावेश प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमामध्ये करणे.

5. नव्याने निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधींचे परिचय प्रशिक्षण (Orientation Training) निवडणुकीनंतर शक्यतो 6 महिन्यात व त्यांचे उजळणी प्रशिक्षण (Refresher Training) दोन वर्षात घेणे.

6. महिला लोकप्रतिनिधी व वंचित घटकातील (SC, ST इ.) लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी विशेष लक्ष द्यावे.

7. "आमचं गाव आमचा विकास" अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडे, पंचायत समिती विकास आराखडे व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करणे, अंमलबजावणी करणे व इतर पैलूंसाठी पंचायत राज संस्थांचे लोकप्रतिनिधी, अधिकारी /कर्मचारी व इतर भागीदार घटकांसाठी प्रशिक्षण घेणे.

8. पंचायत राज संस्थांमधील लोकप्रतिनिधी, अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी राज्यांतर्गत व राज्याबाहेर अभ्यास दौरे आयोजीत करणे.

9. यशदा स्तरावर प्रशिक्षण गरजा विश्लेषण, मोडयूल, वाचन साहित्य तयार करणे. राज्यस्तरीय प्रविण प्रशिक्षकांची निवड यशदा स्तरावर करण्यात येते. जिल्हा व क्षेत्रीय प्रविण प्रशिक्षकांची निवड जिल्हा पातळी वर करण्यात येते. विविधस्तरीय प्रविण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण यशदा स्तरावर पूर्ण करण्यात येते. यामध्ये क्रांतीज्योती, सूक्ष्मनियोजन, पंचायत प्रक्रिया व सुप्रशासन, विकेंद्रीकरण, पेसा, ई-पंचायत व त्रिस्तरीय साधन व्यक्ती यांचा समावेश असतो.

10. जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील लोकप्रतिनिधी व अधिका-यांचे आणि ग्रामपंचायतीचे सरपंच यांचे प्रशिक्षण यशदा स्तरावर घेण्यात येते. जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचा-यांचे प्रशिक्षण जिल्हा स्तरावर घेण्यात येतात. उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक व इतर ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हा पंचायत संसाधन केंद्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, पंचायत राज प्रशिक्षण केंद्रे व तालुका स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत घेण्यात येतात.

11. राज्यामध्ये सध्या 9 ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे, 11 पंचायत राज प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत, त्यांचेमार्फत तालुका स्तरावरील प्रशिक्षण घेण्यात येते.

12. नव्याने निवडणूका झालेल्या ग्रामपंचायतीमधील महिला ग्रामपंचायत सदस्यांसाठी क्रांतीज्योती धर्तीवर विशेष प्रशिक्षण घेण्यात येते. यासाठी विशिष्ट प्रशिक्षण मोड्यूल, वाचन साहित्य व तज्ञ प्रशिक्षक इत्यादी बाबींची पूर्तता करण्यात येते. या माध्यमातून नव्याने निवडून आलेल्या महिला ग्राम पंचायत सदस्यांचे सचेतन करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

13. पेसा क्षेत्रातील ग्राम पंचायतीमध्ये "पेसा" कायद्याशी सुसंगत व अनुरुप प्रशिक्षण घेण्यात येतो. "पेसा" अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. पेसा क्षेत्रातील ग्राम सभा संचेतनासाठी विशिष्ट उपक्रम घेण्यात येतात.

14. मॉडेल ग्रामपंचायतींना Peer / Panchayat Learning Centers (PLCs) म्हणून विकसित करणे.

15. प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमाचे फलनिष्पत्तीवर आधारित मूल्यमापन करणे.

## फ) कार्यपध्दती व सनियंत्रण -

1. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत दरवर्षी वार्षिक कृती आराखडा करून तो राज्य कार्यकारी समिती (SEC) च्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यात येतो.
2. केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाकडून केंद्रीय अधिकारप्राप्त समिती (CEC) मार्फत छाननी होऊन वार्षिक कृती आराखडयास मान्यता देण्यात येते.
3. वार्षिक कृती आराखडा मंजूर झाल्या नंतर केंद्र शासनाकडून निधीचा पहिला हप्ता व त्याप्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा असा एकूण निधी प्राप्त होऊन तो State Nodel Account (SNA) मध्ये जमा करण्यात येतो.
4. मंजुर आराखडयानुसार सर्व उपक्रमांचे जिल्हानिहाय उद्दीष्टये निश्चित करुन त्याप्रमाणे जिल्हयांना PFMS मार्फत निधी आहरण मर्यादा मंजुर करण्यात येते.
5. प्राप्त होणा-या निधी मर्यादेमधून जिल्हा परिषदामार्फत जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामस्तरावरील प्रशिक्षण घेण्यात येते.

6. जिल्हास्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) हे नोडल अधिकारी असून, ते जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPMU) व तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU) मार्फत कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात.
7. प्रशिक्षण उपक्रमांचे नियोजन जिल्हा परिषद, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र (GTC), पंचायत राज प्रशिक्षण केंद्र (PRTC) यांचेमार्फत करून, प्रत्येक संस्थेचे उद्दीष्ट निश्चित केले जाते.
8. यशदास्तरावरील उपक्रमांची अंमलबजावणी राज्य ग्रामीण विकास यंत्रणा (SIRD) व त्यांचे अंतर्गत कार्यरत राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) मार्फत करण्यात येते.
9. प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी प्रत्येक उपक्रमाचे प्रशिक्षण मोडयुल्स, सादरीकरण (प्रेझेन्टेशन), प्रशिक्षण वेळापत्रक, वाचन साहित्य इ. बाबींची पुर्तता राज्य ग्रामीण विकास यंत्रणा (SIRD) मार्फत करण्यात येते.
10. या सर्व उपक्रमांचे आढावा व सनियंत्रण विविध स्तरावरील समित्यामार्फत करण्यात येते.
11. त्याचप्रमाणे राज्य व्यवस्थापन कक्ष-पंचायत राज या कार्यालयामार्फत नियमितपणे व वेळोवेळी कार्यक्रमाचा VC मार्फत आढावा घेण्यात येतो.

## ग) संगणक प्रणाली मार्फत ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच मानधन व कर्मचारी वेतन, आपले सरकार सेवा केंद्राचे केंद्र चालकांचे मानधन अदाई कामे व सर्व संगणक प्रणाली/पोर्टल्स अदयावत ठेवणे -

राज्य शासनाने सी.एस.सी. ई गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड मार्फत ग्राम पंचायत सरपंच, उपसरपंच मानधन व ग्रामपंचायत कर्मचारी वेतन अदाई करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित केलेली असून त्यानुसार राज्य शासनाकडून निधी प्राप्त करून घेऊन दरमहा सरपंच, उपसरपंच यांचे मानधन आणि ग्राम पंचायत कर्मचा-यांचे वेतन अदाई करण्यात येते.

त्याचप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्र सुरु ठेवण्यासाठी सी.एस.सी. ई गव्हर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड मार्फत नियुक्त केलेल्या केंद्र चालकांचे मानधन संगणक प्रणालीमार्फत अदा करण्यासाठी जिल्हा परिषद मार्फत ग्राम पंचायतीकडून निधी एकत्रित करून, त्यानिधीमधून सी.एस.सी. कंपनीस राज्य शासनाने केलेल्या सामंजस्य करार ( Memorandum of understanding - MoU) प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

केंद्र व राज्य शासनाने विकसित केलेली विविध स्वरूपाच्या संगणक प्रणाली/पोर्टल्स अदयावत करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्राचे केंद्र चालक यांची मदत घेऊन पाठपुरावा करण्यात येतो.

## ह) माहितीचा अधिकार कायदा 2005 नुसार तपशील -

1. जन माहिती अधिकारी – उप संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य पुणे

2.अपिलिय अधिकारी - संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य पुणे

# परिशिष्ट - 1
## दिशादर्शक समिती

सदर समिती मा. मंत्री, ग्राम विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येईल. या समितीची बैठक दर वर्षी कमीत कमी एकदा घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. मंत्री, (ग्राम विकास विभाग) | अध्यक्ष |
| 2 | मा. मंत्री (पाणीपुरवठा) | सदस्य |
| 3 | मा. राज्यमंत्री (ग्राम विकास विभाग) | उपाध्यक्ष |
| 4 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| 5 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| 6 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| 7 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| 8 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग) | सदस्य |
| 9 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सामाजिक न्याय) | सदस्य |
| 10 | महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| 11 | सहसचिव/उपसचिव, (पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) ग्राम विकास विभाग | सदस्य |
| 12 | संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| 13 | पंचायतराज क्षेत्रात काम करणा-या २ प्रतिष्ठित व्यक्ती (मा. अध्यक्षाव्दारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| 14 | सर्वोत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायतीमधून निवडून आलेले २ प्रतिनधी (मा. अध्यक्षाव्दारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| 15 | सर्वोत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायतीमधून निवडून आलेले २ महिला प्रतिनधी (मा. अध्यक्षाव्दारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| 16 | २ जिल्हा परिषद अध्यक्ष (रोटेशनव्दारे) | सदस्य |
| 17 | २ पंचायत समिती अध्यक्ष (रोटेशनव्दारे) | सदस्य |
| 18 | संचालक (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे | सदस्य |

**समितीचे कार्य**

1. राज्यघटनेच्या 73 व्या घटना दुरूस्ती नुसार पंचायतराज संस्थांकडे विविध विषय, कर्मचारी व निधीचे हस्तांतरण करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे.
2. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाच्या अपेक्षित फलनिष्पत्तीच्या दृष्टीने नियंत्रण ठेवणे.
3. अभियानांतर्गत उपक्रमांना शासनाच्या प्राधान्य क्रमानुसार दिशा देणे.

# <u>परिशिष्ट - 2</u>

## <u>राज्य सुकाणू समिती</u>

ही समिती मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येईल. या समितीची वर्षातून किमान एक बैठक घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| 2 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| 3 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| 4 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| 5 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| 6 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग) | सदस्य |
| 7 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) | सदस्य |
| 8 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग) | सदस्य |
| 9 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) | सदस्य |
| 10 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषी विभाग) | सदस्य |
| 11 | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती व तंत्रज्ञान विभाग) | सदस्य |
| 12 | संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| 13 | संचालक (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे. | सदस्य सचिव |

**<u>समितीचे कार्य</u>**

1. पंचायतराज संस्थांकडे विविध विषय, कर्मचारी, निधीचे हस्तांतरण व विकेंद्रीकरणास वेग देणे.
2. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधणे.
3. पंचायतराज संस्थांमधील विविध घटकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्य शासनाच्या इतर विभागांमार्फत सूरु असलेल्या कार्यक्रमांची सांगड घालणे.

## परिशिष्ट - 3
## राज्य कार्यकारी समिती

ही समिती अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्रा. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल. या समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका घेण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | अध्यक्ष |
| 2 | सह/उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| 3 | सह/उप सचिव, मगांग्रारोहयो | सदस्य |
| 4 | सह/उप सचि , सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| 5 | सह/उप सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| 6 | सह/उप सचिव (वित्त), ग्राम विकास विभाग | सदस्य |
| 7 | सह/उप सचिव (राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) ग्राम विकास विभाग | सदस्य |
| 8 | सह/उप सचिव (पंचायत राज ) ग्राम विकास विभाग | सदस्य |
| 9 | संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई | सदस्य |
| 10 | संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, पुणे | सदस्य |
| 11 | संचालक, (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे. | सदस्य सचिव |

**समितीचे कार्य**

1. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचे वार्षिक कृती आराखडयांना मान्यता देऊन अंतिम मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविणे.
3. अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायतींना तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.
4. केंद्र शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीच्या प्रमाणात 40% राज्य हिस्सा उपलब्ध करून देणे.
5. अभियानांतर्गत भौतिक व आर्थिक साध्याचा आढावा घेवून सनियंत्रण करणे.
6. अभियानांतर्गत आवश्यक ते सर्व वित्तीय व इतर निर्णय घेणे.
7. अभियानांतर्गत कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मानधन, नियुक्तीच्या अटी / शर्ती व प्रशासकीय धोरण ठरविणे.

## **परिशिष्ट** - 4
## **जिल्हा सनियंत्रण समिती**

ही समिती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल. या समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| 1 | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| 2 | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | सह अध्यक्ष |
| 3 | प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.) | सदस्य |
| 4 | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) | सदस्य |
| 5 | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणी पुरवठा) | सदस्य |
| 6 | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) | सदस्य |
| 7 | प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन) | सदस्य |
| 8 | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.ग़ां. ग्रा.रो.ह.यो.) | सदस्य |
| 9 | समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| 10 | कृषी विकास अधिकारी | सदस्य |
| 11 | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| 12 | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| 13 | कार्यकारी अभियंता (बांधकाम, पाणी पुरवठा व लघुपाटबंधारे) | सदस्य |
| 14 | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| 15 | शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | सदस्य |
| 16 | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | सदस्य सचिव |
| 17 | जिल्हा व्यवस्थापक, पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | सदस्य |
| 18 | प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | सदस्य |
| 19 | प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले पंचायतराज प्रशिक्षण केंद्र | सदस्य |
| 20 | प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले संयुक्त प्रशिक्षण केंद्र | सदस्य |

**समितीचे कार्य**

1. जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हास्तरावरील विविध विभाग प्रमुखांचा सहभाग वाढवून समन्वय साधणे.
2. अभियानांतर्गत उपक्रमांची मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे.
3. अभियानाच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचा नियमितपणे आढावा घेवून सनियंत्रण करणे.
4. अभियानांतर्गत विविध उपक्रमांसाठी आवश्यक असलेली जिल्ह्यातील सर्व संसाधनांचा पुरेपूर वापर करण्यासाठी संबंधीत घटकांशी समन्वय साधणे.
5. जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत विकास आराखडे, पंचायत समिती विकास आराखडे व जिल्हा परिषद विकास आराखडा केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करून मुदतीत ई ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करणे.
6. केंद्र शासनाने विकसित केलेल्या विविध संगणक प्रणालींचा परिणामकारक वापर करून त्यामध्ये माहिती वेळोवेळी अदयावत करणे.